**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 04.02.2025** **वार- मंगळवार**

---

**मंत्रिमंडळ**

पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी 315 कोटी 5 लाख रूपयांच्या खर्चाला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

**पिफ**

23 व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन गणेश कला क्रीडा रंगमंच इथं येत्या 13 फेब्रुवारी रोजी राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते होईल,असं महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं. 'शो मॅन ; राज कपूर'' ही यंदाच्या महोत्सवाची संकल्पना असून ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे, तसंच ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना 'पीफ डिस्टींग्वीश अॅवार्ड', तर ज्येष्ठ गायिका कविता कृष्णमूर्ती यांना संगीतकार एस. डी. बर्मन पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. Margherita Vicario दिग्दर्शित Gloria हा उद्घाटनाचा चित्रपट असेल तर Pedro Almodovar यांनी दिग्दर्शित केलेल्या The Room Next Door या चित्रपटानं महोत्सवाची सांगता होणार असल्याचं पटेल यांनी सांगितलं. 20 फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात पीव्हीआर आयकॉन, आयनॉक्स, आणि सिनेपोलीस चित्रपटगृहात चित्रपट दाखविले जाणार आहेत.

**अहिल्या देवी होळकर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जन्म वर्षानिमित अहिल्या नगर जिल्ह्यातील चौंडी इथं अभिवादन सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या रविवारी सकाळी 10 ते सायंकाळी 5 यावेळेत होणाऱ्या या विशेष सभेमध्ये देशभरातील 400 कर्तृत्ववान महिलांचा सहभाग असेल, अशी माहिती महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थचे कार्याध्यक्ष रवींद्र देव यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली दिली. कार्यक्रमाचं उद्घाटन दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलपती डॉ. शांतिश्री पंडित

यांच्या हस्ते होणार आहे. तर समारोप सत्रात 'लोकमाता अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी समारोह समितीच्या सचिव कॅप्टन मीरा दवे संबोधित करणार आहेत.

**सेवाभवन**

सेवा भवन या पुण्यातील रुग्णसेवा प्रकल्पानं मूत्रपिंडाच्या आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी ‘सेवा भवन दौड़’ या उपक्रमाचं आयोजन केलं आहे. येत्या 9 फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता कर्वेनगरमधील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेपासून त्याचा प्रारंभ होईल, अशी माहिती प्रकल्पाच्या पदाधिकाऱ्यानी दिली आहे.

**पुरस्कार**

ज्योतिष शास्त्राच्या प्रचार-प्रसारासाठी कार्य करणारे दिवंगत पंडित श्रीकृष्ण जकातदार यांच्या 26 व्या स्मृतीदिनानिमित्त दादासाहेब प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'मंदाश्री' पुरस्कार यंदा गोव्याचे नामवंत ज्योतिषी रवींद्र कामत आणि पुण्याच्या लेखिका, वक्त्या कविता काळे यांना जाहीर झाला आहे. येत्या 7 फेब्रुवारी रोजी पुरस्कार वितरण होईल अशी माहिती प्रतिष्ठानचे विश्वस्त विजय जकातदार यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळवली आहे.

**सैनिक कल्याण विभाग**

माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता आणि वीरपिता यांनी ऑनलाईन पद्धतीने आर्थिक मदतीचा लाभ घेण्याकरता www.ksb.gov.in या संकेतस्थळावर नवीन ओळखपत्रासाठी नोंदणी करावी असं आवाहन सैनिक कल्याण विभागानं केलं आहे.

**खासगी रुग्णालयं**

पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागानं शहरातील 714 खासगी रुग्णालयांची तपासणी केली आहे. दरपत्रक नसणे, तक्रार निवारण क्रमांक नसणे, रुग्ण हक्क सनद, जैववैद्यकीय कचरा आदी नियमांचं उल्लंघन करणाऱ्या 76 रुग्णालयांना नोटीस बजावली असून सुधारणा करण्यासाठी महिन्याची मुदत दिली आहे. अशी माहिती पुणे महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर सूर्यकांत देवकर यांनी दिली.

**पाणी**

सिंहगड रस्ता परिसरातील विहीरी, टॅंकरमधील पाणी दूषित असल्याचं यापुर्वीच स्पष्ट झालं होतं. आता खासगी पाणी शुद्धीकरण प्रकल्पातील पाणी देखील दूषित असल्याची माहिती पुढे आली आहे. 30 पैकी 19 "आरओ' प्रकल्पातील पाणी दूषित असल्याचं निष्पन झाल्याने पुणे महापालिका

आयुक्तांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत खासगी टॅंकर, आरओ प्रकल्पांवर कडक कारवाई करण्याचे आदेश पाणी पुरवठा विभागाला दिले आहेत. गेल्या महिन्यापासून सिंहगड रस्ता परिसरातील गावांमध्ये गुलियन बॅरी सिंड्रोमचे रुग्ण मोठ्या संख्येने आढळले होते. त्यानंतर महापालिकेनं पाण्याची तपासणी केली होती. दरम्यान पिंपरी चिंचवडमध्ये जलशुध्दीकरण केंद्रातील यंत्रणा बंद असल्याचं वृत्त निराधार असून लोकांवर अशा अफवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन महापालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्राने केलं आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान 35 अंश तर किमान तापमान 14 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**